# ‘मेट्रो ३’ साठी तोडलेल्या कांदळवनाची भरपाई नवी मुंबईत

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**



**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ या मेट्रो ३ प्रकल्पाच्या धारावी आणि वांद्रे–कुर्ला संकुल स्थानकांसाठी तोडाव्या लागलेल्या कांदळवनाची भरपाई कोपरखैरणे येथे ठाणे खाडीकिनारी करण्यात येत आहे. या ठिकाणी दोन हेक्टर जागेवर आठ हजार ८८८ खारफुटीची रोपे लावण्याची सुरुवात शुक्रवारी करण्यात आली.

संपूर्णपणे भुयारी मार्ग असलेल्या या मेट्रो मार्गिकेवर स्थानकांसाठी खोदकाम करावे लागते. त्यामुळे धारावी आणि वांद्रे–कुर्ला संकुल येथील स्थानकांसाठी एकूण १०८ खारफुटीची झाडे तोडावी लागली. त्याची भरपाई कोपरखैरणे येथे ठाणे खाडीकिनारी नवीन लागवड करून केली जात आहे. या कामी राज्याच्या कांदळवन कक्षाची मदत घेतली जात आहे.

‘प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. कांदळवनांची नव्याने लागवड करून होणारी भरपाई एकप्रकारे पर्यावरण जपण्याचे पाऊल आहे,’ असे मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांनी सांगितले. कोपरखैरणे येथे राज्याचा कांदळवन कक्ष दोन हेक्टरवर दोन प्रजातींची लागवड करणार असल्याची माहिती एमएमआरसीचे कार्यकारी संचालक (नियोजन) आर. रामण्णा यांनी दिली. यावेळी कांदळवन कक्षाचे विभागीय वनअधिकारी डी. आर. पाटील व इतर अधिकारी उपस्थित होते.

लोकसत्ता
Tue, 01 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56707352